(सोबत सामान्य प्रशासन विभागाचे "दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awareness Week) साजरा करण्याबाबत – दि.२९ ऑक्टोबर, २०१२ ते दिनांक ३ नोव्हेंबर, २०१२" या विषयाचे शासन परिपत्रक क्रमांक दजस-२०१२/प्र.क्र.६९/११-अ, दिनांक २०.१०.२०१२ ची प्रत सोबत जोडत आहे)

—.—.—.—.—.—

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१२/शा३१९६७
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : ३१/१०/२०१२

प्रति,

१. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

(सही) ३१/१०

प्र. सहा. संचालक (अ.तां.),
तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई
का.प्र.
३१/१०/१२

प्रत :- कार्यासन क्रमांक १२, मु.का. मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

~~प्र.क्र./आस्था~~
प्र.क्र. विभाअ/आस्था/संकीर्ण/२०१२/२९२५
दिनांक :-०५/११/२०१२

प्रतिलिपी, माहिती तथा आवश्यक कार्यवाही करिता.
प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती
शासकीय औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय, अमरावती.
शासकीय निवासी महिला तंत्र निकेतन, यवतमाळ
शासकीय तंत्र निकेतन, अमरावती/यवतमाळ/खामगाव/वाशिम/मुर्तिजापूर.

प्रोग्रामर, तंत्र शिक्षण प्रा.का. अमरावती
सोबत ई-मेल करण्या करिता.

(सही)
सहसंचालक
तंत्र शिक्षण, अमरावती.

(सोबत **"दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awareness Week) साजरा करण्याबाबत - दिनांक २९.१०.२०१२ ते दिनांक ३.११.२०१२"** या विषयाबाबतच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्र क्रमांक : दजस-२०१२/प्र.क्र. ६९/११-अ, दिनांक २०.१०.२०१२ ची प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित)

30 OCT 2012

पृष्ठांकन क्रमांक : संकीर्ण २०११ / प्र.क्र. १७-२०११/आस्था-२
उच्च व तंत्रशिक्षण विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २९.१०.२०१२

प्रति,

मा. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्रशिक्षण) याचे स्वीय सहायक,
विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव,
संचालक (उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / व्यवसायशिक्षण / व्यवसाय प्रशिक्षण / कला / ग्रंथालय),
कुलसचिव, सर्व अकृषिक विद्यापीठे,
विभागातील सर्व अवर सचिव / कक्ष अधिकारी,
निवडनस्ती.

(बा. म. राऊत)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

क्रीडा व युवक सेवा संचालनालय / उच्च व तंत्र शिक्षण विभाग

कार्यासन : आरसी-२
दिनांक : २५/१०/२०१२
आवक क्रमांक : २६०९
२९/१०/२०१२

२१९५
प्रा.१५८१.
२९.१०.१२

दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awareness Week) आयोजित करण्याबाबत
दि.२९ ऑक्टोबर,२०१२ ते दिनांक ३ नोव्हेंबर,२०१२

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक :- दजस-२०१२/प्र.क्र.६१/११-अ
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक : २० ऑक्टोबर, २०१२

पहा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :- संकीर्ण-२००१/११२८/ प्र.क्र.४३/०१/११-अ,
दिनांक : २१ ऑक्टोबर, २००१

## परिपत्रक

राज्यात दरवर्षी दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awareness Week) आयोजित करण्याचा निर्णय संदर्भाधीन दिनांक २१ ऑक्टोबर, २००१ च्या शासन आदेशान्वये घेण्यात आला आहे. सदर आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

२. या वर्षी दिनांक २९ ऑक्टोबर ते दिनांक ३ नोव्हेंबर, २०१२ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याचे केंद्रीय दक्षता आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१२ च्या परिपत्रकान्वये कळविले आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

३. या वर्षी राज्यात दिनांक २९ ऑक्टोबर ते दिनांक ३ नोव्हेंबर, २०१२ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताहाचे (Vigilance Awareness Week) आयोजन करण्यात यावे, असे कळविण्यात येत आहे. सप्ताहाचे आयोजन करताना दिनांक २१ ऑक्टोबर, २००१ च्या शासन निर्णयातील अ,ब,क,ड व इ या मुद्यांमध्ये नमूद केलेल्या सूचनांचा अवलंब करण्यात यावा. या सप्ताहानिमित्त घ्यावयाच्या प्रतिज्ञा/शपथेचा नमुना तसेच मा. राज्यपाल महोदय आणि मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या संदेशाच्या प्रती सोबत जोडण्यात येत आहेत. विहित नमुन्यातील शपथग्रहणाचा एक कार्यक्रम विभागीय / कार्यालयीन स्तरावर दक्षता सप्ताहाच्या कालावधीत आयोजित करण्यात यावा.

३. या सप्ताहाच्या आयोजनासाठी स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करुन दिला जाणार नसल्याने प्रत्येक कार्यालयाने त्यांच्याकडील उपलब्ध निधीतून खर्च करावयाचा आहे.

४. दक्षता जनजागृती सप्ताहाच्या आयोजनासंबंधीची जबाबदारी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांच्यावर सोपविण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

५. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या सूचना त्यांच्या आधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणाव्यात.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक २०१२१०२०१७२२२६२३०७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

२०.१०.१२
(पां.जो.जाधव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
शासनाचे मुख्य सचिव/ सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
* महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
* महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवडनस्ती.
* पत्राने

ROTA/H 1895(2900-10-2012)

Telegraphic Address :
"SATARKTA: New Delhi
E-Mail Address
cenvigil@nic.in
Website
www.cvc.nic.in
EPABX
24651001 - 07
फैक्स/Fax : 24616286

सत्यमेव जयते

केन्द्रीय सतर्कता आयोग
CENTRAL VIGILANCE COMMISSION

सतर्कता भवन, जी.पी.ओ. कॉम्पलैक्स,
ब्लॉक-ए, आई.एन.ए., नई दिल्ली-110023
Satarkta Bhawan, G.P.O. Complex,
Block A, INA, New Delhi 110023

सं./No. 012/VGL/063

दिनांक / Dated 28/09/2012

Circular No.16/08/12

## SUB : Observance of Vigilance Awareness Week – 2012.

Central Vigilance Commission being the apex integrity institution of country, has been striving to promote integrity in various Central Government offices and public sector undertakings. Observance of Vigilance Awareness Week every year is a step towards this direction by the Commission whereby all the stake holders are enthused to fight corruption.

2. The Commission has decided that this year the Vigilance Awareness Week would be observed from 29th October (Monday) to 3rd November (Saturday) 2012. The observance of the Vigilance Awareness Week should commence with the pledge (copy enclosed) on 29th October, 2012 at 11.00 a.m. This year the theme of observing Vigilance Awareness Week is "Transparency in Public Procurement".

3. Substantive part of activities of a number of public organizations includes procurement of goods, works and other services. Integrity in public procurement, therefore, is a priority area in any anti-corruption strategy. The risk of corruption in public procurement is dependent on various factors like cost of the procurement, complexity of the technology involved, the urgency to acquire the goods or immediacy of the project and the extent of discretion enjoyed by the procurement officials. A sound procurement system should be able to address these risk factors. For emphasising transparency, accountability and probity in public procurement, the Commission is committed to raise awareness.

4. Apart from creating awareness, the Commission expects public organizations to introduce e-procurement, e-payment etc. by leveraging technology and make measurable progress in the days ahead in this regard. The Commission emphasizes the public officials to act with integrity, without any fear or favour. Wherever there is a knowledge gap with regard to public procurement; measures for proper capacity building should be undertaken.

5. Ministries/ Departments/ PSUs/ Banks/ Organisations are advised to consider the following activities during the Vigilance Awareness Week :-

i. To display banners, posters etc. at prime locations in their offices;
ii. To organize seminars/ workshops inviting prominent faculty;
iii. To organize competitive debates/ lectures/essays on anti-corruption topics amongst the employees and the students in the colleges/ schools and to distribute prizes;
iv. To bring out special issue of journals during the period; and
v. To request the non-government organizations, institution and service associations in the local area to participate in the Vigilance Awareness campaign.

6. Public Sector Enterprises, societies and local authorities are also advised that message (pledge) may be read to Board of Directors by respective Chairman in the Board / Governing body meeting being held prior to the Vigilance Awareness Week. Public Sector Enterprises, Banks and Insurance Companies are advised to organize programmes regarding awareness against corruption among the youth by involving schools/ colleges.In the local area through their units / branches.

7. A report about the manner in which the Week was observed may be sent to the Central Vigilance Commission by 15th December, 2012, by each organisation.

8. This notification is also available on the Commission's website at http://cvc.nic.in.

(K.D Tripathi)
Secretary

**Encl: As stated.**

To

(i) The Secretaries of all Ministries / Departments of Government of India
(ii) The Chief Secretaries of all States / Union Territories
(iii) The Comptroller & Auditor General of India
(iv) The Chairman, Union Public Service Commission
(v) Chief Executives of all PSUs / Banks / Organizations
(vi) All Chief Vigilance Officers in Ministries / Departments / PSEs / Public Sector Banks / Insurance Companies / Autonomous Organizations / Societies.

GR.200410271624410001-0100

दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awareness Week) साजरा करण्याबाबत.
दि.३१ ऑक्टोबर, ते ६ नोव्हेंबर

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२००१/१२१८/प्र.क्र.४३/०१/११-अ,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक २२.१०.२००१.

**शासन निर्णय :-**

राज्यात गतवर्षी प्रथमच दि. ३१ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर, २००० या कालावधीत "दक्षता जागरुकता सप्ताह" (Vigilance Awareness Week) आयोजित करण्यात आला होता. जनतेमध्ये भ्रष्टाचाराबाबत जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने सदर उपक्रम अत्यंत उपयुक्त सिध्द झाल्याने आता, प्रतिवर्षी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दि.३१ ऑक्टोबर या जन्मदिवसापासून एक आठवडा (दि. ३१ ऑक्टोबर ते ६ नोव्हेंबर) या कालावधीत "दक्षता जनजागृती सप्ताहाचे"(Vigilance Awareness Week) आयोजन करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला आहे.

दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन करताना पुढे नमूद केलेल्या मार्गांचा अवलंब करण्यात यावा.

अ) राज्य शासनाचे सर्व विभाग व त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुख, राज्य शासनाचे अंगीकृत उपक्रम, सहकारी संस्था, स्वायत्त संस्थामार्फत सप्ताहाचे आयोजन करण्यात यावे.

ब) दि. ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.०० वाजता भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ घेऊन कार्यक्रमाचा प्रारंभ होईल. विभाग/ कार्यालय प्रमुख किंवा उपस्थितांपैकी ज्येष्ठतम अधिकारी सर्वांना शपथ देतील. (शपथेचा नमुना सोबत जोडला आहे.)

क) शपथ घेतल्यानंतर मा.राज्यपाल व मा.मुख्यमंत्री यांनी या सप्ताहानिमित्त दिलेला संदेश उपस्थितांना वाचून दाखविण्यात येईल.

ड) या सप्ताहाच्या निमित्ताने मा.राज्यपाल व मा.मुख्यमंत्री यांचा संदेश राज्यातील जनतेसाठी प्रसृत करण्यात यावा.

इ) या सप्ताहाच्या निमित्ताने पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे.

१. कार्यालयाच्या दर्शनी भागात व मोक्याच्या ठिकाणी भित्तीपत्रकं, कापडी फलक लावणे.
२. कार्यालये/शाळा/महाविद्यालयांमध्ये भ्रष्टाचाराच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकण्यासाठी चर्चासत्रे/ वादविवाद स्पर्धा/व्याख्याने/निबंधस्पर्धा/कार्यशाळा यांचे आयोजन करणे.
३. विशेष पुस्तिकांचे (Special Journal) प्रकाशन करणे.
४. राज्यातील अशासकीय संघटना, स्वयंसेवी संस्था, सामान्य नागरीक यांना दक्षता जनजागृती मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन करणे.

क्र.मा.प.

५. केंद्रीय दक्षता आयोगाच्या http://www.cvc.nic.in या संकेतस्थळावर (Web-site) उपलब्ध साहित्याचा जनतेमध्ये वितरणासाठी उपयोग करणे.

याव्यतिरिक्त कार्यालयीन इमारतीच्या दर्शनी भागावर "भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंध विभागाशी संपर्क साधावा" अशी सूचना व लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या स्थानिक कार्यालयाचा पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक लिहिलेला कायमस्वरूपी फलक लावण्यात यावा.

या सप्ताहाच्या आयोजनासाठी स्वतंत्रपणे निधी उपलब्ध करुन देता येणार नसल्याने प्रत्येक कार्यालयाने त्यांच्याकडील उपलब्ध निधीतूनच खर्च करावा.

दक्षता जनजागृती सप्ताहाच्या आयोजनासंबंधीची जबाबदारी महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंध विभाग यांच्यावर सोपविण्यात येत आहे. त्यांनी याबाबतचा अहवाल शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(बी.के.अग्रवाल)
शासनाचे अपर मुख्य सचिव.

प्रति,

राज्यपालांचे प्रधान सचिव,
मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान सभा सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान परिषद सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* आयुक्त राज्य निवडणूक आयोग, मुंबई .
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख,
सा.प्र.विभागातील सर्व प्रशासकीय कार्यासने,
निवड नस्ती.

* पत्राने.

## PLEDGE

WE, THE PUBLIC SERVANTS OF INDIA, DO HEREBY SOLEMNLY PLEDGE THAT WE SHALL CONTINUOUSLY STRIVE TO BRING ABOUT INTEGRITY AND TRANSPARENCY IN ALL SPHERES OF OUR ACTIVITIES. WE ALSO PLEDGE THAT WE SHALL WORK UNSTINTINGLY FOR ERADICATION OF CORRUPTION IN ALL SPHERES OF LIFE. WE SHALL REMAIN VIGILANT AND WORK TOWARDS THE GROWTH AND REPUTATION OF OUR ORGANISATION. THROUGH OUR COLLECTIVE EFFORTS, WE SHALL BRING PRIDE TO OUR ORGANISATIONS AND PROVIDE VALUE BASED SERVICE TO OUR COUNTRYMEN. WE SHALL DO OUR DUTY CONSCIENTIOUSLY AND ACT WITHOUT FEAR OR FAVOUR.

## प्रतिज्ञा

आम्ही भारताचे लोकसेवक, याद्वारे गांभीर्यपूर्वक अशी प्रतिज्ञा करतो की, आम्ही आमच्या सर्व कार्यक्षेत्रात सचोटी व पारदर्शकता आणण्याचा सातत्याने आटोकाट प्रयत्न करु. आम्ही अशीही प्रतिज्ञा करतो की, जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी आम्ही सर्वतोपरी कार्य करु. आम्ही दक्ष राहून आमच्या संघटनेच्या वृध्दीसाठी व लौकीकासाठी कार्य करु. आमच्या सामुदायिक प्रयत्नांनी आम्ही आमच्या संघटनांना अभिमान प्राप्त करुन देऊ आणि आमच्या देशबांधवांना मूल्याधिष्ठीत सेवा पुरवू. आम्ही आमचे कर्तव्य निष्ठापूर्वक पार पाडू आणि भय किंवा पक्षपात याविना कार्य करु.

Sankaranarayanan
GOVERNOR OF MAHARASHTRA

सत्यमेव जयते



RAJ BHAVAN
Mumbai 400 035
Tel. : 022-2363 2660
Fax : 022-2368 0505

19 October 2012

# MESSAGE

One of the major obstacles in the path of our country's progress and development is corruption. Unless tackled urgently, corruption could hamper the pace of our surging economy and affect the fair image of the country in the eyes of our own people and those of the world at large. Today there is tremendous anger in our society against corruption at all levels. We have to seize this opportunity to get rid of corruption from all walks of life.

It is necessary to strengthen the moral fabric of society by inculcating morals and values in students and youths. At the community level, we need to make our organisations transparent, people-friendly and corruption-free. We also need to identify and isolate public servants who resort to corruption. The theme of this year's Vigilance Awareness Week is 'Transparency in Public Procurement'. One way of ensuring transparency in procurement is to introduce e-procurement and e-payment by using technology wherever possible.

I am glad that the Government of Maharashtra is organizing the 'Vigilance Awareness Week' between 29 October and 3 November this year. Let us resolve to end corruption and work for the cause of good governance.

(K. Sankaranarayanan)

मुख्य मंत्री

महाराष्ट्र

सत्यमेव जयते



# शुभेच्छा

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही २९ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर, २०१२ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह (Vigilance Awareness Week) साजरा करण्यात येत असल्याचे समजून आनंद वाटला.

शासकीय कामकाजात माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन जास्तील जास्त पारदर्शकता आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. प्रशासनातील गतिमानता आणि पारदर्शकता या बाबींना आम्ही प्राधान्य देत आहोत. माहिती तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ई-प्रशासन राबविण्यात येत आहे. ई-टेंडरिंग, शासकीय धारिकांमधील कागदपत्रांचे स्कॅनिंग आणि युआयडी क्रमांकाची विकास कामाशी सांगड यामुळे प्रशासनात आमूलाग्र बदल अपेक्षित आहे. माहितीच्या अधिकाराच्या कायद्यामुळे अनेक अनियमितता आणि घोटाळे उजेडात येत आहेत.

या सर्वच प्रयत्नांतून राज्य शासन भ्रष्टाचार निर्मूलनाच्या दृष्टीने वाटचाल करीत असल्याचे दिसून येते. भ्रष्टाचार निर्मूलनाच्या दृष्टीने शासन करीत असलेल्या प्रयत्नांना सर्व जनतेने सहकार्य करावे, असे आवाहन मी या दक्षता जनजागृती सप्ताहाच्या निमित्ताने करतो.

दक्षता जनजागृती सप्ताहास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

२५ ऑक्टोबर, २०१२

(पृथ्वीराज चव्हाण)